## थोडक्यात महत्त्वाचे



# जी. डी. बापू महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन

**कुंडल :** येथील गांधी एज्युकेशन सोसायटीच्या क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन केले होते. प्रास्ताविक क्रीडा शिक्षक प्रा. व्ही. डी. सावंत यांनी केले. मेजर ध्यानचंद, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या प्रतिमेचे पूजन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. के. एस. नलवडे यांनी खेळाचे महत्त्व विषद केले. मेजर ध्यानचंद यांच्या जीवनातील काही प्रसंग सांगितले. विद्यार्थ्यांनी मन, मनगट, मेंदू यांच्या साहाय्याने आपला संतुलित विकास करावा, असे आवाहन केले. यावेळी क्रीडा दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना प्राचार्य के. एन. नलवडे यांच्याहस्ते प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आले. कार्यक्रमास माजी प्रभारी प्राचार्य डॉ. पी. बी. लाड, सर्व सहकारी, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षकेत्तर, कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रा. एम. जी. सदामते यांनी मानले.

# लाड महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

कुंडल : येथील गांधी एज्युकेशन सोसायटीच्या क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयात सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात प्रथमवर्ष बी.ए. बी.कॉम, सी.ए. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. प्रास्ताविक प्रा.एफ.जी.नदाफ यांनी केले. प्राचार्य के.एम.नलवडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भावी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी शिक्षण महत्वाचे असल्याचे नमूद केले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रा.पी.बी.लुपणे यांनी मानले.

दै तरुण भारत 02/05/2015

# 'केडब्ल्यूसी'ला सर्वसाधारण विजेतेपद

## यजमान विलिंग्डन, चिखली कॉलेजचेही यश

**युवा महोत्सव**

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. ६ : शिवाजी विद्यापीठ आणि विलिंग्डन महाविद्यालयातर्फे ३५ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव झाला. जिल्ह्यातील ४४ महाविद्यालयांतील दीड हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील विविध कलाप्रकार छाप पाडत कस्तुरबाई वालचंद कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. यजमान विलिंग्डन महाविद्यालयाने घवघवीत यश मिळविले. यानंतर विजेत्या संघाची कडेगाव येथे होणाऱ्या मध्यवर्ती स्पर्धेसाठी निवड झाली.

निकाल असा : वक्तृत्व स्पर्धा मराठी विभाग - विश्वासराव नाईक कला वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय (शिराळा), विलिंग्डन महाविद्यालय, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज (चिखली), केडब्ल्यूसी कॉलेज, हिंदी विभाग - देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज (चिखली), कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज (इस्लामपूर), पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज (तासगाव), मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय. इंग्रजी विभाग - अण्णासाहेब डांगे

पान २ वर ▶

दै. सकाळ ता- ०८/०९/ २०१५

# 'केडब्ल्यूसी'ला सर्वसाधारण विजेतेपद

▶ पान १ वरून

कॉलेज (आष्टा), राजे रामराव महाविद्यालय (जत), केडब्ल्यूसी कॉलेज, गरवारे कन्या महाविद्यालय.

वादविवाद - पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज (तासगाव), मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय (इस्लामपूर), देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज (चिखली), बाबासाहेब चितळे महाविद्यालय (भिलवडी).

सुगम गायन - विलिंग्डन कॉलेज, केडब्ल्यूसी कॉलेज, राजारामबापू इन्स्टिट्यूट (राजारामनगर), डांगे कॉलेज (आष्टा).

भारतीय समूहगीत - केडब्ल्यूसी कॉलेज, विलिंग्डन कॉलेज, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (तासगाव), नानासाहेब महाडिक कॉलेज (पेठ)

मूकनाट्य - राजारामबापू कॉलेज (इस्लामपूर), डांगे कॉलेज (आष्टा), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय (इस्लामपूर), पाटील कॉलेज (तासगाव).

पथनाट्य - आरवाडे महाविद्यालय, केडब्ल्यूसी कॉलेज, मिरज महाविद्यालय, कर्मवारी भाऊराव पाटील कॉलेज (इस्लामपूर),

लघुनाटिका- विलिंग्डन कॉलेज, मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय (इस्लामपूर), पाटील महाविद्यालय (तासगाव), केडब्ल्यूसी कॉलेज.

एकांकिका - केडब्ल्यूसी कॉलेज, भारती न्यू लॉ कॉलेज, पाटील महाविद्यालय (तासगाव), गरवारे कन्या महाविद्यालय

लोकसंगीत वाद्यवृंद - देशभक्त आनंदराव नाईक कॉलेज (चिखली), आर्टस् व सायन्स कॉलेज (आष्टा), केडब्ल्यूसी कॉलेज

लोककला - गरवारे कन्या महाविद्यालय, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय (सांगलीवाडी), श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय (आटपाडी).

लोकनृत्य - देशभक्त आनंदराव नाईक कॉलेज (चिखली), केडब्ल्यूसी कॉलेज, कन्या महाविद्यालय (मिरज), कदम महाविद्यालय (सांगलीवाडी).

लावणी - मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कॉलेज (कडेगाव), विश्वासराव नाईक महाविद्यालय (शिराळा), क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय (कुंडल).

दै. सकाळ ता - 06/09/2014

# लाड महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन

**कुंडल : वार्ताहर**

येथील गांधी एज्युकेशन सोसायटीच्या क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

क्रीडाशिक्षक प्रा. व्ही. डी. सावंत यांनी प्रास्ताविक केले. मेजर ध्यानचंद, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. के. एन. नलावडे यांनी खेळाचे महत्त्व विशद केले. मेजर ध्यानचंद यांच्या यांच्या जीवनातील काही प्रसंग सांगितले. यावेळी क्रीडा दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना प्राचार्य के. एन. नलावडे यांच्याहस्ते प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास माजी प्रभारी प्राचार्य डॉ. पी. बी. लाड, सर्व सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दै. केसरी ता. ०८/०९/२०१५

# लाड महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात

कुंडल : वार्ताहर

येथील गांधी एज्युकेशन सोसायटीच्या क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम व बीसीए मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. प्रास्ताविक प्रा. एफ. जी. नदाफ यांनी केले. प्राचार्य के. एन. नलावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भावी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रा. पी. बी. लुपणे यांनी मानले.

दै - केसरी ता- ०८/०९/२०१५



कुंडल : प्राध्यापक जे. ए. पाटील पुरस्कार स्वीकारताना.

# जे. ए. पाटील कालिदास राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

कुंडल : येथील क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक जे.ए.पाटील यांना महात्मा फुले प्रतिभा संशोधन अकादमी, नागपूर यांचे वतीने कालिदास राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार डॉ.अमरसिंह वधान राष्ट्रीय अध्यक्ष व चंद्रभाग भोईर महात्मा फुले, प्रतिभा संशोधन अकादमी नागपूर यांचे हस्ते नागपूर येथे झालेल्या समारंभात प्रदान करणेत आला. या संशोधन अकादमीच्या वतीने देशभरातील संशोधनामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रत्येक वर्षी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. प्रा. जे.ए.पाटील अंजणीचे असून ते कुंडल येथील जी.डी. बापू लाड महाविद्यालयात १७ वर्षे अध्यापनाचे काम करत आहेत. त्यांनी १९६५ मध्ये एम.फिल पदवी प्राप्त केली असून आतापर्यंत त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये त्यांचे शोधनिबंधांचे वाचन केले असून ते प्रसिद्ध झाले आहेत. तसेच त्यांनी हिंदीतील सुप्रसिद्ध लेखक रांगेय राघव यांच्या साहित्यावर पुस्तकही लिहीले आहे. या त्यांच्या यशाबद्दल अध्यक्ष अरूण लाड, सचिव किरण लाड, शहाजी लाड, शरद लाड यांनी अभिनंदन केले. प्रा. डॉ. के. एम. नलावडे, डॉ. प्रताप लाड यांचे सहकार्य लाभले.

तरुण-भारत 18/5/15

19 सप्टे. 15
दै. केसरी

# जे. ए. पाटील यांना कालिदास पुरस्कार प्रदान



कुंडल : वार्ताहर

येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक जे. ए. पाटील यांना महात्मा फुले प्रतिभा संशोधन अकादमी, नागपूर यांचे वतीने कालिदास राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार डॉ. अमरसिंह वधान (राष्ट्रीय अध्यक्ष व चंद्रभान भोईर (समन्वयक), महात्मा फुले प्रतिभा संशोधन अकादमी, नागपूर यांच्याहस्ते नागपूर येथे झालेल्या समारंभात प्रदान केला.

या संशोधन अकादमीच्या वतीने देशभरातील संशोधनामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रत्येक वर्षी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. प्रा. पाटील हे अंजनी (ता. तासगाव) चे आहेत. ते कुंडल येथील जी. डी. बापू लाड महाविद्यालयात १७ वर्षे अध्यापनाचे काम करीत असून त्यांनी १९९५ मध्ये एम. फिल. पदवी प्राप्त केली आहे. त्या त्यांच्या यशाबद्दल गांधी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरुण लाड, किरण लाड, शहाजी लाड, शरद लाड यांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, डॉ. प्रताप लाड व इतर सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे त्यांना सहकार्य लाभले.

सकाळ



## जे. ए. पाटील यांचा सन्मान

कुंडल : येथील क्रांती महाविद्यालयातील प्राध्यापक जे. ए. पाटील यांना कालिदास राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार डॉ. अमरसिंह वधान (राष्ट्रीय अध्यक्ष व चंद्रभान भोईर-समन्वयक), महात्मा फुले प्रतिभा संशोधन अकादमी, नागपूर यांच्याहस्ते नागपूर येथे झालेल्या समारंभात प्रदान करण्यात आला.